# सिन्नर नगरपरिषद, सिन्नर

महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ४५ व महाराष्ट्र नगर परिषद नगर पंचायती आणि औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम १८९ अन्वये

ई-गव्हर्नन्स

## बांधकाम परवाना मंजुरी

प्रति, श्री अशोका निर्मीत प्रा.लि.अनुप एस. कटारीया

सिन्नर,सिन्नर

विषय – बांधकाम परवाना मंजुरी व प्रारंभ प्रमाणपत्र देणेबाबत.

अर्ज क्र. -- 13517072400018 अर्ज दि. -- 24/07/2017

महाशय,

आपण खालील ठीकाणी महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायती आणि औद्योगिक नगरे अधिनियम १९६५ च्या कलम १८९ अन्वये व महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ४४/६९ अन्वये विकास कार्य करण्यासाठी बांधकाम परवाना मिळण्यासाठी दिनांक 24/07/2017 रोजी केलेल्या अर्जास अनुसरून या खालील व पाठीमागे दिलेल्या शर्ती व अटीस पात्र राहून आणि या सोबतच्या बांधकाम नकाशावर लाल रंगाने दर्शविलेल्या सुधारण्यास पात्र राहून आपणास हे प्रारंभ प्रमाणपत्र म.प्रा.व न.र. अधिनियम १९६६ चे कलम ४५ नुसार हा बांधकाम परवाना BPA\00057\2017-18 वापरासाठी देणेत येत आहे.

### बांधकामच्या जागेचे वर्णन

| | | | |
|---|---|---|---|
| सि.स.क्र. | :- - | रि.स.क्र. | :- 931/1/3/2अ/2 |
| गट क्र. | :- — | भूखंड क्र. | :- 224+225+230+231 |
| रस्ता | :- - | शहर | :- सिन्नर |
| वापराचा प्रकार | :- निवासी | प्लॉट क्षेत्र | :- ~~845.99~~ 720.00 |
| वापराचा उप प्रकार | :- | मजले | :- 4 |
| वापरलेला एफ् एस् आय् | :- | विभाजीत क्षेत्र तपशील | :- निवासी - - 845.99 |
| बाकी एफ् एस् आय् | :- | | |
| खास शर्ती / अटीवर | :- | | |

1. सदर प्रमाणपत्र अर्जदारास मिळाले तारखेपासून एक वर्षपयंत वैध राहील. एका वर्षाच्या आत काही कारणास्तव बांधकाम न झाल्यास किंवा अपूर्ण राहिल्यास प्रमाणपत्राचे नुतनीकरण करणे आवश्यक आहे. तसे न केल्यास महाराष्ट्र प्रादशिक व नगर रचना अधिनियम 1966 चे कलम 48 अन्वये सदर परवानगी रद्द ठरेल.
2. प्रमाणपत्र मिळाल्यानंतर प्रत्येक बारा महिन्याचे आत नुतनीकरण केल्यानंतर तीन वर्षापर्यंत वैध राहील. व तीन वर्षानंतर परवानगी रद्द समजावी
3. सदर प्रमाणपत्र बदल करण्याचा, अटीमध्ये वाढ करण्याचा व मंजूर नकाशात बदल करण्याचा हक्क मुख्याधिकारी यांनी राखून ठेवला आहे.
4. बिनशेतीची परवानगी योग्य त्या विभागप्रमुखाकडुन घेतल्याशिवाय बांधकाम करु नये.
5. बांधकाम मंजूर नकाशाप्रमाणेच करावे बांधकाम कोणत्याही प्रकारचा फेरफार पुर्व परवानगी घेतल्याशिवाय करु नये.
6. नगरपरिषदेच्या विकास नियमानुसार बांधकाम असले पाहिजे.
7. बांधकामाचा वापर ज्याप्रकारची परवानगी असेल त्याच प्रकारचा करावा.
8. मंजूर नकाशासह सदर प्रमाणपत्र केव्हांही जागेवर उपलब्ध होईल अशी खबरदारी घ्यावी. नगरपरिषदेच्या अधिका-यांनी अथवा इतर शासकिय अधिका-यांनी मागणी केली असता त्यांना सदर कागदपत्र दाखविणे आवश्यक आहे.
9. अ)जागेवर प्रत्यक्ष बांधकाम चालु करणे पुर्वी उपअधिक्षक,भूमिअभिलेख खात्याकडून मंजूर रेखांकनाप्रमाणे मोजणी करुन घेणे आवश्यक आहे.
10. ब)अर्जदार यांनी सादर केलेली माहिती व जागेवरील खुणा खोटया अथवा दिशाभुल करणा-या असल्यास वा आढळल्यास सदरची परवानगी रद्द समजण्यात येईल.
11. जागेसंबधी अथवा बांधकामासंबंधी कोणताही वाद निर्माण झाल्यावर त्यांसंबंधी सर्व जबाबदारी तुमच्यावर राहील. बांधकाम फक्त अर्जदाराच्या मालकी हद्दीतच करावे.
12. बांधकाम सुरु करणे आधी इतर सर्व संबंधीत कायदयाखाली तत्संबधी घ्यावयाची परवानगी ही सर्वस्वी जबाबदारी अर्जदार याची राहील.
13. नगरपरिषदेच्या परवानगी शिवाय सार्वजनिक रस्त्यावर बांधकामाचा माल अथवा ढिग साठवता येणार नाही, ज्यावेळी अशी परवानगी दिली जाईल त्याच वेळी नियमाप्रमाणे किंवा नगरपरिषद ठरवील त्या दराने भाडे अर्जदाराने नगरपरिषदेस घ्यावयाचे आहे.
14. बांधकाम करतावेळेस सार्वजनिक रस्त्यावर बांधकाम साहित्य रहदारीस अडथळा होईल अशाप्रकारे टाकू नये. तसे केल्यास नगरपरिषद सदरचे साहित्य उचलून घेईल व त्याकामी येणारा खर्च आपणाकडून वसूल करणेत येईल.
15. टिपः- अशी परवानगी बांधकाम पूर्ण होई पर्यंतच देण्यात येईल. बांधकाम पुर्ण झाल्यावर बांधकामाचा माल अथवा ढिग न हलविल्याने जनतेस त्रास गैरसोय निर्माण झाल्याचे नगरपरिषदेस आढळून आल्यास नगरपरिषद अर्जदाराविरुध्द कारवाई करील व माल अथवा ढिग स्वतःनगरपरिषद हटवून घेईल व सदरकामी आलेला खर्च अर्जदाराकडून वसूल केला जाईल
16. इमारतीचे सांडपाणी इतरस्ततः सोडून सार्वजनिक आरोग्यास धोका निर्माण करु नये. सांडपाणी नगरपरिषदेच्या गटारीत सोडावे. गटार नसल्यास स्वतःच्या जागेत सोकपीट बांधून सांडपाण्याचा निचरा करण्याची सोय करावी.
17. घरात जाणे येणे करिता नगरपरिषदेचे गटारीवर ढापा टाकावा.ढापा गटारी इतकी रुंद 3 फुट लांब व रस्त्याचे बरोबर असावा.
18. शौचालय बांधकाम करतेवेळी 1 व 2 नंबराच्या टाकीवर 4 इंची व्यासाचे 2 व्हेंट पाईप बसवावी त्यावर वरच्या बाजुस दोन टोप्या बसवाव्यात मात्र हे वेन्ट पाईप जवळील इमारतीचे उंचीपेक्षा 5 फुट उंच असावे.
19. शौचालयाच्या कमीत कमी 30 फुटाच्या अंतरावर आड अगर विहीर नसावी.

# सिन्नर नगरपरिषद, सिन्नर

**महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ४५ व महाराष्ट्र नगर परिषद नगर पंचायती आणि औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम १८९ अन्वये**

20. महाराष्ट्र नगरपरिषदा व नगरपंचायती औदयोगिक नगरी अधिनियम 1965 चे कलम183 अन्वये सदर घराचे बांधकाम बांधकाम पुर्ण झाल्यापासून एक महीन्याचे आंत भोगवटा प्रमाणपत्र (Completion Certificate) मिळणेसाठी नगरपरिषदेकडे बांधकाम पुर्णत्वाच्या दाखल्यासाठी अर्ज करावा सदर प्रमाणपत्र मिळाल्यानंतर इमारतीचा वापर सुरु करावा. परवानगी शिवाय इमारतीचा वापर केल्याचे आढळून आल्यास उपरोक्त कलमान्वये कार्यवाहीस पात्र रहाल.
21. विकास परवानगी/बांधकाम मिळाल्याबरोबर भूखंड धारकांने/जमीन मालकांने/विकसनकर्त्याने संबधीत भूखंड/जमिनीवर खालीलप्रमाणे सविस्तर तपशिल असलेला 'फलक' लावणे बंधनकारक राहील
22. अ) मालक/विकासक/वास्तु विशारद आणि कंत्राटदार यांचे नांव पत्ता
23. ब) संबधीत भूखंडाचा सर्व्हे नंबर/सि.स.नं.वार्ड नंबर व भूखंडाचे चारही हद्दीचे सविस्तर तपशिल व क्षेत्र
24. क) नगरपरिषदेने मंजुरी केलेल्या परवानगीचा नंबर व दिनांक
25. ड) मंजूर नकाशानुसार नमूद केलेले बांधकामाचे अनुज्ञेय क्षेत्र
26. ई) एकूण रहिवासी वापरासाठीच्या सदनिकांची संख्या व वाणिज्य वापरासाठीच्या दुकानांची संख्या व वाणिज्य वापरासाठीच्या दुकानांची गाळयाची संख्या,प्रत्येक गाळयांचे/ सदनिकांचे क्षेत्रासहीत
27. फ) मंजूर नकाशांची प्रत पाहण्यासाठी ज्या ठिकाणी उपलब्ध होऊ शकेल अशा ठिकाणी सविस्तर पत्ता
28. नियोजित बांधकाम हे भूकंप रोधक करण्याचे दृष्टीने भारतीय मानक संस्थेने निर्देशित केलेल्या मानकानुसार बांधकाम करणे बंधनकारक राहील.
29. बांधकामाच्या नियोजित जागेतून विधुत वाहिनी जात असल्यास बांधकाम करण्यापूर्वी संबधित खात्याकडून ती स्थलांतर करुन घेणे बंधनकारक राहील. भारतीय विधुत अधिनियम व त्याखालील नियमांचे उल्लंघन होणार नाही हयाची खबरदारी घेण्याची जबाबदारी अर्जदारावर राहील.
30. बांधकाम नकाशावर दर्शविलेल्यानुसार जल संधारणाची व्यवस्था करणे बंधनकारक राहील. त्याशिवाय इमारत भोगवटाप्रमाणपत्र मिळणार नाही.
31. सदर भूखंडात कमीत कमी 5 झाडे लावून त्याचे जतन व संवर्धन करावे. त्याशिवाय भोगवटाप्रमाणपत्र दिले जाणार नाही.
32. सदर इमारतीवर अपांरपारिक सौर ऊर्जा सयंत्र बसविणे तसेच सौर ऊर्जेवर चालणारे गरम पाण्याचे सयंत्र बसविणे बंधनकारक राहील.
33. इमारतीवरील पाऊस पाणी संकलनाची शास्त्रीय पध्दतीने व्यवस्था केलेशिवाय भोगवटा प्रमाणपत्र देय असणार नाही.
34. अपार्टमेंट टाईप इमारतीत टेरेसवर किमान 5000 लिटर क्षमतेची टॅंक बांधणे तसेच 450 लीटर व 0.3 N/mm2 क्षमतेचा पंप बसविणे बंधनकारक आहे.
35. शासन परिपत्रक, नगर विकास विभाग क्र. एफ .ए.आ 102004 / 160 / प्र.क्र. 27 / न.वि - 20 दि. 27/02.2004 मधिल शासननिर्णयानुसार सदर बांधकामासाठि सिमेंट पलेंश, विटा, ब्लोक्स,टाइल्स यांचा वापर करने बंधनकारक आहे.
36. आवश्यक असणारे शासकीय विभाग, जसे मा. जिल्हाधिकारी, राष्ट्रीय महामार्ग विभाग,सार्वजनिक बांधकाम विभाग,म.रा.वि.वि.क. इ यांची परवानगी /ना हरकत प्रमाणपत घेण्याची सर्वस्वी जबाबदारी अर्जदाराची राहिल .
37. उपरोक्त अटींचे उल्लंघन झाल्याचे निदर्शनास आल्यास सदरील बांधकाम परवानगी कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्याचा अधिकार नगरपरीषदेने राखुन ठेवलेला आहे .

येणेप्रमाणे परवाना दिला असे , 41

बांधकाम परवाना क्रमांक द. नं. :- BPA\00057\2017-18
दिनांक :- 29/07/2017

प्रत माहितीसाठी
कर निर्धारण अधिकारी
**सिन्नर नगरपरिषद, सिन्नर**

स्थापना-१८६० EST.1860 Sinnar Nagar Parishad

अभियंता
सिन्नर नगरपरीषद सिन्नर

मुख्याधिकारी
सिन्नर नगरपरिषद, सिन्नर